0 8 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची सांख्यिकी अधिकारी पदावर निवड

**जनप्रवास : कोल्हापूर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेतलेल्या सांख्यिकी अधिकारी/ संशोधन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) पदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.






पृथ्वीराज झांबरे आदिनाथ पाटील रविंद्र देवरे सोनम पाटील






निकेत जाधव स्वनिल माने तेजश्री राजे विद्या वालकोळी

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातील सांख्यिकी अधिकारी / संशोधन अधिकारी या पदासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, आदिनाथ तुकाराम पाटील, रविंद्र एकनाथ देवरे, सोनम श्रीकांत पाटील, निकेत गणेश जाधव, स्वनिल सतीश माने, तेजश्री मनमोहन राजे आणि विद्या बाळासाहेब वालकोळी यांचा समावेश आहे. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांच्यासह सर्व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या भरती प्रक्रियेत राज्यभरातून निवड झालेल्या २५ उमेदवारांपैकी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, हे प्रमाण ३२ टक्के इतके आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची प्रभावी परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

## 'संख्याशास्त्र अधिविभागाची गुणवत्ता अधोरेखित'

संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आज केंद्र व राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाच्या पदांवर येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रातही विविध पदांवर विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. दरम्यान, आठ विद्यार्थ्यांच्या यशामुळे अधिविभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्याने अधोरेखित झाली आहे. विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांसाठीही त्यांचे यश प्रेरणादायी आहे. या विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक अभिनंदनास पात्र आहेत, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी काढले.

**• विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांसाठी यश प्रेरणादायी : कुलगुरू डॉ. कामत**

0 8 AUG 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे आठ विद्यार्थी सांख्यिकी अधिकारीपदी

**त.भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या सांख्यिकी अधिकारी संशोधन अधिकारी (गट–ब, राजपत्रित) पदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातील सांख्यिकी अधिकारी (डीएसओ)/ संशोधन अधिकारी (आरओ) या पदासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, आदिनाथ तुकाराम पाटील, रविंद्र एकनाथ देवरे, सोनम श्रीकांत पाटील, निकेत गणेश जाधव, स्वनिल सतीश माने, तेजश्री मनमोहन राजे व विद्या बाळासाहेब वालकोळी यांचा समावेश आहे. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांच्यासह सर्व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या भरती प्रक्रियेत राज्यभरातून निवड झालेल्या २५ उमेदवारांपैकी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, हे प्रमाण ३२ टक्के इतके आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची प्रभावी परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

**संख्याशास्त्र अधिविभागाची गुणवत्ता अधोरेखित**

**केंद्र व राज्य शासनासह अनेक महत्त्वाच्या खासगी क्षेत्रातील विविध पदांवर शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या यशामुळे संख्याशास्त्र अधिविभागाची गुणवत्ता सिद्ध झाली आहे.**

**कुलगुरू डॉ. राजनीश कामत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

0 8 AUG 2026
सकाळ

# सांख्यिकी अधिकारीपदी आठ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर, ता. ७ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या सांख्यिकी अधिकारी- संशोधन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) पदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली. पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, आदिनाथ तुकाराम पाटील, रवींद्र एकनाथ देवरे, सोनम श्रीकांत पाटील, निकेत गणेश जाधव, स्वप्नील सतीश माने, तेजश्री मनमोहन राजे आणि विद्या बाळासाहेब वालकोळी यांचा निवड झालेल्या विद्यार्थ्यांत समावेश आहे. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांच्यासह शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाच्या पदांवर येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे खासगी क्षेत्रांतही विविध पदांवर विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. आज आठ विद्यार्थ्यांच्या यशामुळे अधिविभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्याने अधोरेखित झाली आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी काढले.

08 AUG 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रासायनिक प्रदूषण चाचणीसाठी स्मार्ट उपकरण

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना डिझाईन पेटंट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील संशोधक डॉ. अविराज कुळदीप व त्यांच्या सहकाऱ्यांनी विकसित केलेल्या 'स्मार्ट कम्पोझिट मटेरियल टेस्टिंग डिव्हाईस'ला भारत सरकारचे डिझाईन पेटंट मंजूर झाले. रासायनिक प्रदूषणावर प्रभावी उपाय म्हणून विकसित करण्यात आलेले उपकरण पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.

सेमीकंडक्टर फोटो कॅटॅलिसिस तंत्रज्ञानावर आधारित हे उपकरण ग्राफिटिक कार्बन नायट्राईड व टायटॅनियम डायऑक्साईड यांच्या प्रगत संयुगापासून तयार केले आहे.



### डॉ. कुळदीप यांना यापूर्वी केंद्र सरकारचा पुरस्कार

दरम्यान, डॉ. अविराज कुळदीप यांना यापूर्वी २०२४ मध्ये यूके डिझाईन पेटंट प्राप्त झाले आहे. पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना केंद्र सरकारचा 'स्वच्छता सारथी फेलो पुरस्कार-२०२३' मिळाला आहे.

कापड उद्योग व रासायनिक कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यातील विषारी रंगद्रव्यांचे अत्यल्प खर्चात विघटन करण्याची क्षमता उपकरणात आहे. त्यामुळे सांडपाणी प्रक्रिया अधिक परिणामकारक, पर्यावरणपूरक व किफायतशीर होणार आहे.

नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल. संशोधनात डॉ. राहुल मारुती माने, डॉ. किशोरकुमार खोत, डॉ. कल्याणराव गरडकर आणि डॉ. शरदचंद्र पाटील यांनी सहसंशोधक म्हणून योगदान दिले आहे. कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण व इंडस्ट्रियल केमिस्ट्रीचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.

0 8 AUG 2026
सकाळ

# डॉ. अर्जुन चव्हाण यांना 'आंतरराष्ट्रीय प्रेमचंद सन्मान'


डॉ. चव्हाण

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांना यंदाचा 'आंतरराष्ट्रीय प्रेमचंद सन्मान' जाहीर झाला. नार्वेस्थित 'भारतीय-नॉर्वेजीय सूचना एवं सांस्कृतिक फोरम' संस्थेतर्फे हा प्रतिष्ठेचा सन्मान जाहीर झाला.

हिंदी कथा सम्राट व मानवतावादी लेखक प्रेमचंद यांच्या १४६व्या जयंतीनिमित्त ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेत ही घोषणा झाली. हिंदी साहित्य क्षेत्रातील कथा, कविता लेखन, हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन डॉ. चव्हाण यांची निवड केली. पुरस्कारामुळे त्यांच्या साहित्यिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेल्याचे अधोरेखित झाले. यापूर्वी त्यांना हिंदी साहित्य अकादमी, मुंबई, हिंदी साहित्य अकादमी, मॉरिशस, साहित्य शिरोमणी, सुब्रमण्य भारती साहित्य सेतू, जीवनगौरव, कवी कालिदास भूषण, लाइफटाइम अचिव्हमेंट, हिंदी साहित्य विभूषण व साहित्याचार्य विभूषण यांसह ५० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवले. ते म्हणाले, 'प्रेमचंद यांच्यासारख्या महान साहित्यिकांच्या नावाने मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, त्यामुळे साहित्य क्षेत्रातील माझी जबाबदारी अधिक वाढली आहे.'

0 8 AUG 2026

तरुण भारत

थोडक्यात महत्वाचे

# मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा : डॉ. स्नेहा टोणपे



डॉ. स्नेहा टोणपे.

कोल्हापूर : मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा असतात, असे प्रतिपादन लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. स्नेहा टोणपे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात "शोध मातृदेवतांचा" या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. डॉ. टोणपे म्हणाल्या, मातृदेवतांचे एकूणच व्यापक स्वरूप जटील स्वरूपाचे आहे. शेती, जल, संस्कृतीची विविध रूपे मातृदेवतांत दिसून येतात. त्याचप्रमाणे संस्कृती उत्क्रांतीच्या अनेक पाऊलखुणाही त्यांच्यामध्ये आढळतात. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मातृदेवतांची चिकित्सा व अभ्यासाकडे आजच्या संशोधक विद्यार्थ्यांनी नवदृष्टीने पाहिले पाहिजे. मानवी अस्तित्वाच्या अनेक खुणा मातृदेवतांच्या अभ्यासातून शोधता येतात. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. डॉ. नंदकुमार मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 8 AUG 2026
पुण्यनगरी

# मातृदेवतांमध्ये संस्कृतीच्या पाऊलखुणा : टोणपे

कोल्हापूर : मातृदेवतांचे एकूणच व्यापक स्वरूप जटील आणि व्यामिश्र स्वरूपाचे आहे. मातृदेवतांमध्ये संस्कृती वाटचालीच्या पाऊलखुणा असतात, असे प्रतिपादन लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. स्नेहा टोणपे यांनी केले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'शोध मातृदेवतांचा' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. शेती, जल, संस्कृतीची विविध रूपे मातृदेवतांत दिसून येतात, त्याचप्रमाणे संस्कृती उत्क्रांतीच्या अनेक पाऊलखुणाही त्यांच्यामध्ये आढळतात, असेही त्यांनी सांगितले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी, मानवी अस्तित्वाच्या अनेक खुणा मातृदेवतांच्या अभ्यासातून शोधता येतात. तसा दृष्टिकोन ठेवून संशोधन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

0 8 AUG 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाने तृतीयपंथीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा

## शिवानी गजबर यांचे प्रतिपादन : शहाजी महाविद्यालयात लिंग समभाव, संवेदना, जाणीव व जनजागृती कार्यक्रम

**जनप्रवास : कोल्हापूर**

तृतीयपंथी समाजातील सर्व व्यक्ती ही वयाच्या १८ ते १९ वर्षापर्यंत स्त्री किंवा पुरुषच असतात. शारीरिक आणि मानसिक बदलांमुळे त्यांच्यात लिंग बदल होतो. या बदलांमुळे कुटुंब या व्यक्तींना बाहेर काढते, नाईलाजाने या व्यक्तींना तृतीयपंथी समाजात सामील व्हावे लागते, तृतीयपंथी असणारा हा समाज रामायण, महाभारतामध्ये सुद्धा होता. त्यांना तेथे मानाचे स्थान होते. सरकारने २०१४ पासून या समाजाला काही सोईसवलती दिलेल्या आहेत. तृतीयपंथी समाजातील लोकांना आरक्षण द्यावे, समाजाने त्यांच्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलावा, तो सकारात्मक ठेवत तृतीयपंथीय माणसंच आहेत, असा दृष्टिकोन




असला पाहिजे, असे प्रतिपादन तृतीयपंथी हक्क संरक्षण कल्याण मंडळ पुणेच्या सहअध्यक्षा शिवानी गजबर यांनी केले.

शहाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व आयक्यूएसी यांच्या वतीने आयोजित लिंग समभाव, संवेदना, जाणीव व जनजागृती यावरील, होय! आम्ही सुद्धा माणसे आहोत या व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांचे या कार्यक्रमास मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

प्राचार्य डॉ.आर.के.शानेदिवाण म्हणाले, तृतीयपंथी समाज विविध सोयी सुविधांपासून वंचित आहे. माणूस म्हणून जगण्याचा त्यांना संविधानाने अधिकार दिलेला आहे. आपल्यातीलच ही माणसे आहेत. त्यांना माणूस म्हणून जगू द्या. अशा विशेष व्याख्यानातून माणूस समजून घेण्याची प्रक्रिया घडते, असे ते म्हणाले. समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के. एम. देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. एम. देसाई यांनी संयोजन केले. प्रा. पी. पी. भाटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. व्ही. कुरणे यांनी आभार मानले. समाजकल्याण विभाग कोल्हापूरचे समन्वयक सचिन कांबळे, डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. ए. बी. बलुगडे, आर. जे. भोसले, मनीष भोसले, डॉ. पांडुरंग पाटील, आदी उपस्थित होते.

0 8 AUG 2026

जनप्रवास

# प्रा. कुराडे यांच्या सत्कारासह 'प्रबोधक' ग्रंथाचे सोमवारी प्रकाशन

**जनप्रवास : गडहिंग्लज**

ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत प्रा. किसनराव कुराडे यांच्या साहित्य, शिक्षण, समाजप्रबोधन आणि वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जाहीर सत्कार तसेच त्यांच्या निवडक साहित्यावर आधारित 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य (खंड-१)' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ सोमवार, १० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अनिल म्हमाने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

निर्मिती प्रकाशन प्रकाशित 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य (खंड-१)' या ग्रंथाचे संपादन डॉ. कपिल राजहंस आणि डॉ. शोभा चाळके-म्हमाने यांनी केले आहे. प्रा. कुराडे यांच्या वैचारिक, सामाजिक आणि साहित्यिक योगदानाचा वेध घेणारा हा ग्रंथ अभ्यासक, विद्यार्थी आणि वाचकांसाठी महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत हे असतील. ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ.



श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार असून, विद्रोही कवी व साहित्यिक दंगलकार नितीन चंदनशिवे यांच्या हस्ते प्रा. किसनराव कुराडे यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी भरत रसाळे, उत्तम कांबळे, सुरेश केसरकर, ॲड. करुणा विमल यांची उपस्थिती असणार आहे. साहित्य, शिक्षण, समाजप्रबोधन आणि परिवर्तनवादी विचारांशी निगडित सर्व साहित्यप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अंतिमा कोल्हापूरकर यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेला अनिल म्हमाने, भरत रसाळे, मदन पवार, डॉ. कपिल राजहंस, डॉ. वसंत भागवत, अंतिमा कोल्हापूरकर, शंकर पुजारी, सुनिल जाधव, विश्वासराव तरटे आणि गंगाधर म्हमाने उपस्थित होते.

0 8 AUG 2026

पुण्यनगरी

# प्रा. कुराडे यांच्या प्रबोधक ग्रंथांचे सोमवारी प्रकाशन

**गडहिंग्लज :** ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते प्रा. किसनराव कुराडे यांच्या साहित्य, शिक्षण, समाजप्रबोधन आणि वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जाहीर सत्कार, तसेच त्यांच्या निवडक साहित्यावर आधारित 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य (खंड-१)' या १ हजार पानांच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ सोमवारी ( दि. १० ) सकाळी ११.३० वा. राजर्षी शाहू स्मारक भवन, मुख्य सभागृह, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अनिल म्हमाने यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असणार आहेत. ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ. श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार असून, नितीन चंदनशिवे यांच्या हस्ते प्रा. किसनराव कुराडे यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अंतिमा कोल्हापूरकर यांनी केले आहे.



0 8 AUG 2026

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयातील कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व संशोधन विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बौद्धिक संपदा हक्क, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क अर्ज प्रक्रिया' या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला प्रतिसाद लाभला. कार्यशाळेत हेनान विद्यापीठ (चीन) येथील प्रा. शान्हू लिऊ, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. टी. डी. डोंगळे व राजाराम कॉलेजचे प्रा. डॉ. पी. यू. लांडे यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्रात बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, दस्तऐवजीकरण व अर्ज दाखल करण्याबाबत माहिती देण्यात आली. कार्यशाळेचे दुसरे सत्र १० ऑगस्ट रोजी होणार आहे. यात अर्ज भरण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शुभांगी काळे, डॉ. संजय लठ्ठे व डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.